सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**Savitribai Phule Pune University**
**Formerly Pune University**

अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष
गणेशखिंड, पुणे–४११००७
दूरध्वनी क्रमांक : ०२०–२५६२१०४८/९
ई–मेल : iqac@unipune.ac.in
संकेतस्थळ - www.unipune.ac.in

**Internal Quality Assurance Cell**
**Ganeshkhind, Pune – 411007**
**Contact No. : 020-25621048/9**
**E-mail - iqac@unipune.ac.in**
**Website – www.unipune.ac.in**

अंगुहक/ ३४८/२०२५
IQAC/

दिनांक : २१/०८/२०२५
Date: २२

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलंग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये
आणि मान्यताप्राप्त परिसंस्था,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय – अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) मध्ये **शैक्षणिक वर्ष २०२४–२५** ची माहिती डी.सी.एफ.मध्ये भरणे व अपलोड करण्याबाबत.

संदर्भ– मा. शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे उशिसं/सांख्यिकी/AISHE/२०२४–२५/2025/E-199356, दि. २२/०७/२०२५ चे कार्यालयीन पत्र.

महोदय/महोदया,

प्रतिवर्षाप्रमाणे उच्चतर शिक्षा विभाग, शिक्षा मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यांच्याकडून भारतातील तसेच महाराष्ट्र राज्यातील उच्च शिक्षणाबाबतचे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी **शैक्षणिक वर्ष २०२४–२५** ची सांख्यिकी माहितीची अत्यंत आवश्यकता आहे. त्याअनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलंग्न असलेल्या पुणे, अहिल्यानगर, नाशिक जिल्हयातील व दादरा नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशातील अनुदानित, विनाअनुदानित व कायमविनाअनुदानित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांकडून **AISHE** पोर्टलव्दारे माहिती **मंगळवार दि. १५ जुलै, २०२५** पासून मागविण्यात येत आहे.

सन २०२४–२५ मध्ये/पूर्वी ज्या महाविद्यालये/परिसंस्थांना राज्य सरकारकडून मान्यता व विद्यापीठातील शैक्षणिक विभागाकडून संलंग्नीकरण मिळालेले आहे अशा सर्व महाविद्यालये/परिसंस्थांनी अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम (**AISHE**) पोर्टलवर नोंदणी करून माहिती भरणे बंधनकारक आहे. जर संबंधित महाविद्यालये/परिसंस्थांनी सदर वेबपोर्टलवर नोंदणी करून माहिती भरली नाही तर भविष्यात होणा–या नुकसानीस संबंधित महाविद्यालये/परिसंस्थेचे मा. प्राचार्य/संचालक व मा. नोडल अधिकारी जबाबदार असतील याची कृपया गांभिर्यपूर्वक नोंद घ्यावी. सन २०२४–२५ पूर्वी ज्या महाविद्यालये/परिसंस्थांनी अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम (**AISHE**) पोर्टलवर नोंदणी केलेली नाही अशा महाविद्यालये/परिसंस्थांनी सदर वेबपोर्टलवर नोंदणी का केलेली नाही याचा खुलासा मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे त्वरीत सादर करावा आणि त्याची प्रत विद्यापीठातील अंतर्गत गुंणवत्ता हमी कक्षाकडे सादर करून तातडीने सदर वेबपोर्टलवर नोंदणी करून सहकार्य करावे.

तसेच **शैक्षणिक वर्ष २०२४–२५** मध्ये ज्या नवीन महाविद्यालये/ परिसंस्थांना नव्याने मान्यता मिळालेली आहे, अशा महाविद्यालये/परिसंस्थांनी अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम (**AISHE**) पोर्टलवर महाविद्यालये/परिसंस्थांचे नांव समाविष्ट करण्यासाठी नोडल अधिका–यांचे नांव, मोबाईल नंबर, महाविद्यालय/परिसंस्थांचे नोंदणी केलेले ईमेल आयडी, शासननिर्णय व संलंग्नीकरणाचे इंग्रजी व मराठी पत्र (affiliation letter) इ. माहिती संबंधित पोर्टलवर अपलोड करून नोंदणी करावी.

तसेच पुढील मान्यतेकरिता (Registration Approval) संबंधित महाविद्यालये/परिसंस्थांच्या नोडल अधिका–यांनी मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयाकडे वरील कागदपत्रांसह व्यक्तीशः उपस्थित राहून मान्यता घेणे गरजेचे आहे.

तसेच **संलंग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांनी सन २०२४–२५ च्या अचूक माहिती नोंदणीचे डिसीएफ वेबपोर्टलवर अपलोड केल्याचे प्रमाणपत्र सर्व संलंग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या मा. प्राचार्य/संचालकांकडून घेण्यात यावे. सदरील प्रमाणपत्राची एक प्रत शिक्षण संचालनालयास ईमेलव्दारे (stat.dhepune@nic.in) सादर करण्यात यावी असे उपरोक्त संदर्भीय पत्रामध्ये नमूद केले आहे याची सर्वांनी नोंद घ्यावी.**

संबंधित महाविद्यालये/परिसंस्थांनी अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम **(AISHE)** पोर्टलमध्ये DCF मधील सर्व माहिती पूर्णपणे भरून झाल्यानंतर सदर महाविद्यालये/परिसंस्थांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करून विहीत मुदतीत ना–हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे बंधनकारक आहे, याची महाविद्यालये/परिसंस्थांच्या मा. प्राचार्य/संचालक व मा. नोडल अधिका–यांनी नोंद घ्यावी.

सदर माहिती शासनास अत्यावश्यक असल्याने सर्व संलंग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांनी **शनिवार, दि. ३० ऑगस्ट, २०२५ पर्यंत किंवा त्यापूर्वी पूर्ण माहिती भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात येत असून AISHE वेबपोर्टलवर सांख्यिकी माहिती लवकरात लवकर पूर्ण करून सहकार्य करावे.** यासंदर्भात काही अडचणी आल्यास महाविद्यालये/परिसंस्थांनी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष ०२०–२५६२१०४८/४९/५८ किंवा उच्च शिक्षण संचालनालय, पुणे ०२०२९७०७०९३ यांच्याशी संपर्क साधावा.

22/8/25

(प्रा. डॉ. विनायक जोशी)
संचालक
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष